INTERNATIONAL RESEARCH JOURNAL OF HUMANITIES AND INTERDISCIPLINARY STUDIES
( Peer-reviewed, Refereed, Indexed & Open Access Journal )
DOI : 03.2021-11278686 ISSN : 2582-8568 IMPACT FACTOR : 5.828 (SJIF 2022)

# औरंगाबाद परिक्षेत्रातील घडणा-या गुन्ह्यांचा समाजशास्त्रीय अभ्यास
# (Sociological Study of Crimes in Aurangabad Region)

**डॉ. राजू एस. पोपळघट**
समाजशास्त्र विभाग प्रमुख,
राजर्षी शाहू कला, वाणिज्य व विज्ञान
महाविद्यालय, पाथ्री,
ता. फुलंब्री, जि. औरंगाबाद

**DOI No.** 03.2021-11278686 **DOI Link ::** https://doi-ds.org/doilink/03.2022-93689745/IRJHIS2203015

**प्रस्तावना :**

गुन्हा ही भारतीय समाजव्यवस्थेत आढणारी एक प्रवृत्ती असुन समाजातील व्यक्ती या प्रवृत्तीला बळी पडून गुन्हेगार का बनतात. गुन्हा कशाला म्हणतात. त्याविषयी सखोल विवेचन करण्याचा प्रयत्न केला आहे. समाज व्यवस्थेतील प्रथा, परंपरा, नियम, मुल्ये त्याचबरोबर कायदा या संदर्भातील विविध कारणमीमांसाचा माध्यातून अभ्यास करण्याचा प्रयत्न केला. गुन्हा प्रकार औरंगाबाद परिक्षेत्राचे स्थान कोठे आहे त्याबरोबर गुन्ह्यांची व्याप्ती लक्षात घेतली. औरंगाबाद जिल्ह्यात औरंगाबाद परिक्षेत्रातील, सिल्लोड, सोयगाव, फुंलब्री, कन्नड, वैजापूर, गंगापूर, खुलताबाद व पैठण हे नऊ (०९) तालुके असुन औरंगाबाद १३७२ गावे आहेत. १३७२ पैकी १३३० वस्ती असलेली व ४२ ओसाड गावे आहे. गुन्हांविषयी औरंगाबाद परिक्षेत्रात घडणाऱ्या गुन्ह्यांच्या संदर्भात रोज काहीना-काही वर्तमानपत्राच्या माध्यातून गुन्हे विषयी घटना समोर येतात. खुन, मारामारी, अपहरण, चोरी, बलात्कार, विनयभंग, आत्महत्या, पैशाचा अपहार, सार्वजनिक ठिकाणी दारु पिऊन धिंगाणा, भ्रष्टाचारअसे विविध गुन्हे घडताना समोर येते. औरंगाबाद जिल्ह्यातील कायदा व सुव्यवस्था संदर्भात प्रश्न उपस्थित केला जातो. म्हणून औरंगाबाद परिक्षेत्रातील घडणाऱ्या गुन्हाचा समाजशास्त्रीय अभ्यास प्रस्तुत शोधनिबंधात करण्यात आला आहे.

**शोधनिबंधाचा उद्देश :**

१. गुन्हा म्हणजे काय हे समजुन घेणे.

२. गुन्ह्याचे प्रकार अभ्यासणे

३. औरंगाबाद परिक्षेत्रातील घडणाऱ्या गुन्ह्याविषयी माहिती जाणून घेणे.

**संशोधन पद्धती :**

प्रस्तुत शोधनिबंधाच्या अभ्यास करण्यासाठी वर्णनात्मक व विश्लेषणात्मक पद्धतीचा अवलंब करण्यात आला आहे त्याबरोबर संशोधन पद्धतीतील शोधनिबंधासाठी दुय्यम स्त्रोताचा वापर करण्यात आला असुन यामध्ये संदर्भ ग्रंथ, वर्तमान पत्रे, शासकीय दस्तावेज, मासिके, इंटरनेटचा वापर करण्यात आला आहे.

**गुन्हा :**

गुन्हाची संकल्पना समजून घेण्यासाठी कायदा हा महत्त्वाचा घटक आहे. कायदाचे उल्लंघन झाल्यास त्यास गुन्हा केला असे म्हटले जाते. उदा. एखाद्या समाजातील प्रथा आणि नियमाचे हे त्या समाजातील कायदाच्या पारंपरिक संबधित असल्यास त्याचे विरोधी होणारे वर्तन हे त्या समाजाच्या दृष्टीने त्याचे नियमाचे उल्लंघन होय. म्हणून त्यासंबधी व्यक्तीला समाजातील नियमाचे उल्लंघन केल्यास दंड किवा शिक्षा देण्याची किंवा त्या कुटुंबाला वाळीत टाकण्याची प्रथा होती. परंतु आज समाजातील प्रथा व नियमाचे कायदे सपुंष्टात आले असले. तरी काही समाजात आजही काही प्रमाणात असल्याचे दिसून येते. म्हणजेच समाजाच्या दृष्टिनेत्यातील तो कायदाच होता परंतु भारत स्वतंत्र झाल्यानंतर भारतीय राज्यघटनेमध्ये भारतीय कायदा निर्माण करण्यात आला. त्यानुसार भारतीय समाजव्यवस्था टिकून राहण्यासाठी विविध नियमांचे उल्लंघन झाल्यास संबधित व्यक्तीस शिक्षा, दंड, भरपाई आकारण्यात येते.

गुन्हा विषयी अनेक वेगवेगळ्या व्याख्या आपणास दिसून येतात गुन्हा म्हणजे कायदा व सुव्यवस्था, सुरक्षित या संदर्भात अनेक विचारंवतानी आप-आपल्या परीने गुन्हाविषयी व्याख्या केल्या आहेत. वेस्टर मार्क यांच्या मते, कायदे व संप्रदाय काही मुल्यावर आधारलेले असतात व त्याविरुद्ध वर्तन असेल ते गुन्हा होय. गिलीन यांच्या मते, मानव समाजाचा एका समुदायाच्या मते जे कृत्य समाजास हानिकारक ते कृत्य गुन्हा होय. गुन्हा (Crime) सर्व सामान्यपणे त्या-त्या देशाच्या दण्डविधान किंवा गुन्हेगार कार्यपद्धती कायदाच्या विरोधात किंवा गुन्हेगार कृती करणे म्हणजे गुन्हा होय. गुन्हेगार Crimials गुन्ह्यांच्या संबधित असलेली दुसरी प्रक्रिया आहे. जो व्यक्ती गुन्हा करतो त्यास गुन्हेगार समजले जाते. कारण त्यांनी कोणत्या ना कोणत्या तरी नियमाचे किंवा कायदाचे उल्लंघन केले म्हणजे गुन्हा केला तो म्हणजे गुन्हेगार असे समजले जाते. गुन्हेगाराबद्दल सांगावयाचे झाल्यास कायदाच्या भाषेत'' गुन्हेगार म्हणजे अशी व्यक्ती जिला न्यायालयाने (कोर्टाने) कायदाचे उल्लंघन केल्यास त्याला दोषी ठरविले जाते. अशा व्यक्तींना गुन्हेगार म्हटले जाते म्हणजेच एखाद्या व्यक्तीला पोलिसांनी काही कारणास्तव अटक केली न्यायालयाने त्याची विशेष शिक्षा केली नाही अशा व्यक्तीला मात्र गुन्हेगार संबोधता येत नाही. म्हणजेच एखाद्या व्यक्तीचा गुन्हा केल्या प्रकरणी न्यायालयात प्रकरण गेले असता त्याला गुन्हेगार ठरविता येत नाही. म्हणजेच तो गुन्हेगार नसल्याचे स्पष्ट होते. एखाद्या व्यक्तीला न्यायालयान विशिष्ट गुन्हा केलाबाबत गुन्हेगार ठरवून जेलमध्ये पाठविले. त्या संबधित व्यक्तीने शिक्षा संपवून त्याची जेलमधून सोडल्यानंतर त्याला गुन्हेगार म्हणता येईल का? याबाबत त्याविषयी खुलासा केलेल्या दिसून येत नाही. गुन्हेगार हा दर्जा व्यक्तीला कोण प्रदान करावयाचा आणि केव्हा समाप्त करावयाच्या याचे स्पष्टीकरण सापडत नसल्याचे दिसुन येते.

गुन्हा म्हणजे कायदा विरोधी वर्तन होय. गुन्हा जाणीवपूर्वक केला जातो. गुन्हेगाराचा समाजावर त्याचा वाईट

परिणाम होतो. गुन्हा करण्यामागे काही विशिष्ट हेतू व त्यामागील कारणे जबाबदार असतात. गुन्हा करणाऱ्या गुन्हेगारास काहीतरी शिक्षा करण्याची कायदामध्ये तरतूद केली असते. गुन्हा घडून येण्यासाठी अनेक कारणे कारणीभूत असते. ज्यात समाज संरचनेतील वातारण, आजू - बाजूला राहणारे कुटूंब, मित्र, नातेवाईक अर्थिक स्थिती, समाजातील कुटूंबाचे स्थान, राजकीय क्षेत्र, शिक्षण, व्यक्तीची मानसिक स्थिती, कुटुंबातील ताण-तणाव, पती-पत्नीचे संबध मुलां-मुलीचे वर्तन, अशा कोणत्याना कोणत्या घटनाने प्रभावित होऊन गुन्हा घडण्यास कारणीभूत असलेले अनेक कारणे समोर येतात. समाजातील एक घटक असल्याने गुन्हेगार व्यक्तीचा प्रभाव त्यांच्या कुटुंबावर, मित्रांवर, नातेवाईक त्याचबरोबर समाजघटकावर विधायक परिणाम करते. या सर्वांना गुन्हेगार व्यक्तीच्या संबधीत कुटुंबातील सदस्यांना वेगवेगळ्या शाब्दिक व अनेक समस्यांना तोंड द्यावे लागते.

गुन्ह्यांच्या संबध व्यक्ती आणि समाज याच्याशी संबधीत असल्याने गुन्हा ही एक सामाजिक घटना म्हणता येईल. व्यक्ती आणि समाज यांच्या दृष्टिने गुन्हा ही सामाजिक समस्या असुन ती प्राचीन काळापासून भारतीय समाज व्यवस्थेत निर्माण झालेला आढळून येते. समाजातील सर्व घटकांनी व्यक्तीकडून असणाऱ्या अपेक्षा आधारावर समाजाचे एकत्रित नियमाप्रमाणे वर्तन होत नाही. तर ते वर्तन समाजाच्या दृष्टीने अमान्य असते असे वर्तन म्हणजे गुन्हा समजला जातो. समाजातील नियमाचे उल्लंघन करणाऱ्या लोकांना गुन्हेगार म्हणता येईल.

**गुन्ह्याचे प्रकार :**

भारतातील बहुसंख्य गुन्हेगारांना भारतीय दंडविधान कायद्यातील तरतुदीनुसार न्यायालय शिक्षा देते. या कायद्याने गुन्ह्याचे प्रकार सात गटात मोडते. व्यक्ती जिल्ह्याचे गुन्हे, मालमत्ते विरुद्धचे गुन्हे, दस्ताऐवज विरुद्धाचे गुन्हे, मानसिक व्यवस्था बिघडविणारे गुन्हे, राज्यविरुद्धचे गुन्हे, सरकारी नोकरीशी संबधित गुन्हे, गुन्हा संबधी फक्त केवळ नामोउल्लेखावरुन गुन्ह्यांसंबधी गुन्हेगार लक्षात येते. यामध्ये काही गुन्हे गंभीर स्वरुपाचे, साधारण, पाठरेपेशी गुन्हे असतात बोगर यांनी गुन्ह्यांचे चार प्रकार सांगितले, आर्थिक गुन्हे, यौवनविषयक गुन्हे, राजनैतिक गुन्हे, विविध गुन्हे, तर एडविन हार्डीन सदरलड यांनी गुन्ह्याचे गाभीर्य विचारात घेऊन गुन्ह्यांचे अतिगंभीर स्वरुपाचे गुन्हे केल्यानंतर गुन्हेगारास देवदंड(फाशी) किंवा जन्मठेप (दीर्घ तुरुंगवास) अशा कडक शिक्षा केल्या जातात. खून करणे, सशस्त्र दरोडा टाकणे, देशद्रोह करणे, मादक द्रव्याची निर्मिती व व्यापार करणे तर सामान्य गुन्हे जे केल्यानंतर गुन्हेगारास त्या गुन्हा प्रमाणे शिक्षा दिली जाते. अवादंड करणे, अल्पकाळ तुरुंगवास, नुकसान भरपाई देणे, सार्वजनिक शांततेचा भंग करणे, वाहतुकीच्या नियमाचे उल्लंघन करणे, किरकोळ चोरी करणे. एखाद्यास अपशब्द वापरुन अपमानीत करणे.

**गुन्ह्यांची व्याप्ती :**

गुन्हा, गुन्हेगार व गुन्हेगारी अशारितीने तीन संकल्पना समोर येतात. म्हणून गुन्ह्याला अनुसार गुन्हेगार त्यामाध्यातून पुढे गुन्हेगारी प्रवृत्ती निर्माण होते. गुन्ह्यांची व्याप्ती खुप व्यापक असुन कायदा किंवा नियम मोडणाऱ्या व्यक्तींच्या संबधित दोषी ठरलेल्या व्यक्तींसाठी लागू होते. समाज आणि व्यक्ती यामध्ये समाज आणि सुव्यवस्था टिकून राहण्यासाठी कायद्याची फार मोठी भूमिका आहे. गुन्हेगारांना आळा बसविण्यासाठी कायदा महत्त्वाची निभावत आहे.

गुन्हा का व कसा घडला, त्यामागील कारणे, त्यावेळी परिस्थिती गुन्हा करण्याचा हेतू या बाबी तपासुन त्यास सिद्ध करणे. सिद्ध झाल्यास गुन्हेगार म्हटले जाते.

**औरंगाबाद परिक्षेत्रातील घडणाऱ्या गुन्हाविषयी :**

औरंगाबाद परिक्षेत्रात गुन्ह्याविषयी घटना सातत्याने एकामागोमाग प्रत्येक दिवसेंदिवस वाढ होत असून औरंगाबाद परिक्षेत्रातील कायदा सुव्यवस्थेचा प्रश्न निर्माण होत आहे. कारण औरंगाबाद परिक्षेत्रात खुन, अपहरण, चोऱ्या, दरोडे, बलात्कार, विनयभंग, अपघात, भांडणे, सारख्या गुन्ह्यामध्ये वाढ होत असल्याचे दिसून येते. औरंगाबाद परिक्षेत्रातील गुन्ह्याचे प्रमाण अधिक असल्याने पोलिसांनी अधिक सक्षमपणे तपास करुन गुन्हेगारास अटक करणे गरजेचे आहे.

गुन्हा करणारा व्यक्ती लोकांच्या व समाजाच्या सहज लक्षात येत नाही. गुन्हा करणारा गुन्हेगार मात्र सहजपणे, मनमोकळेपणाने वावरत असतो. काही गुन्हेगार कायदा मोडून सुद्धा त्याला दोषी ठरविता येत नाही. काही गुन्हेगारानी शिक्षा भोगवून सुटका झाल्यानंतर ही पुन्हा-पुन्हा गुन्हा करत असल्याचे वर्तमानपत्रातून लोकांच्या समोर येते. मात्र श्रीमंत व पैशाने बलाढ्य असलेले व्यक्ती कायद्याच्या हातात येत नाही. काही गुन्हेगाराच्या पाठीमागे काही राजकीय क्षेत्रातील बलाढ्य व्यक्तीचा पाठबळ असल्याने अनेक गुन्हेगार परिक्षेत्रात फिरत असतात. त्यांना अटक करण्यास पोलिस यंत्रणापुढे मोठे आव्हान आहे.

**औरंगाबाद परिक्षेत्रातील नोंदवलेले आणि सापडलेल्या गुन्ह्याची आकडेवारी दर्शविणारा तक्ता.**

| अ. क्र. | | २०१७ | | | २०१८ | | | २०१९ | | | २०२० | | |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| | | नोंदवले | सापडलेले | टक्केवारी | नोंदवले | सापडलेले | टक्केवारी | नोंदवले | सापडलेले | टक्केवारी | नोंदवले | सापडलेले | टक्केवारी |
| १ | खून | १९४ | १८५ | ९७ | १७१ | १५८ | ९२ | १६९ | १६१ | ९५ | १८९ | ११५.३ | ६१ |
| २ | एटीटी एमयुर | २५३ | २५२ | १०० | २८४ | २८३ | १०० | २२१ | २२१ | १०० | ३२८ | २७६.५ | ८४ |
| ३ | डकैती | ५० | ४९ | ९८ | ४६ | ४५ | ९५ | ३७ | ३१ | ८४ | ४८ | ३५.०९ | ७३ |
| ४ | दरोडा | १९६ | १३४ | ६८ | १५५ | १३६ | ७२ | २३३ | १४३ | ५१ | १८९ | ६५.२१ | ३६ |
| ५ | एचबीडीएस | २०५ | २१६ | ३१ | ६१९ | १७२ | २८ | ७२५ | १३६ | १९ | ७७६ | १२७.३ | १६ |
| ६ | चोरी | ३०२६ | १२९७ | ४३ | २९९८ | १४७८ | ४९ | ३२११ | १२८९ | ४० | ३३७७ | १२०३ | ३६ |
| ७ | दंगल | १०२३ | १०१३ | ९९ | ११२० | ११६२ | ९८ | ९७३ | ९६९ | १०० | १३७९ | ११४१ | ८३ |
| ८ | दुखापत | २९७७ | २९६९ | १०० | ३१०३ | ३०८१ | १०० | ३०८६ | ३०६९ | ९९ | ४१५३ | ३३६६ | ८१ |
| ९ | बलात्कार | २१३ | २१३ | १०० | २३३ | २३३ | १०० | ८४५ | ८४३ | १०० | ९९.५ | ८४५.५ | ८५ |

| | | | | | | | | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| १० | विनयभंग | ७७१ | ७७१ | १०० | ५३४ | ८३३ | १०० | ८४५ | ८४३ | १०० | ९९५ | ८४५५ | ८५ |
| ११ | अपघात | १९२८ | १७३४ | ३० | २०१६ | १८०१ | ६९ | १८०९ | १६०८ | ८९ | १६६९ | १०३६ | ६२ |
| १२ | इतर आयपीशी | ३०४५ | २८०० | ९२ | ३४३३ | ३१४१ | ९१ | ३२७१ | ३०८३ | ९४ | ३३४५ | २७४० | ८२ |
| १३ | दारुबंदी | ९३२६ | ९३२६ | १०० | ६४३० | ६४५९ | १०० | ६०६२ | ६०६२ | १०० | ६३३२ | ५९९० | ८७ |
| १४ | जुगार | २९५८ | २९५८ | १०० | २७६७ | २७६७ | १०० | २३८७ | २३३७ | १०० | २१७१ | १७८९ | ८२ |
| १५ | इतर पीआय | ४०५५ | ४०२८ | ९९ | ४५२३ | ४४९५ | ९९ | ४२०४ | ४१६८ | ९९ | ५१७० | ४२५३ | ८२ |

वरील तक्त्यामधून औरंगाबाद परिक्षेत्रातील नोदवलेले आणि सापडलेल्या गुन्ह्यांची आकडेवारीवरुन नोंदवलेले गुन्हे आणि सापडलेल्या गुन्हेगाराविषयी माहिती दर्शविलेली आहे. यामध्ये २०१७ ते २०२० पर्यंत गुन्हे गुन्हेगारांची माहिती दर्शविण्यात आली आहे. २०१७ ते २०२० मध्ये नोंदविलेले गुन्हे आणि सापडलेल्या गुन्हेगाराचा विचार केला असता. यामध्ये खुन, एटीटी. एमयुर, डकैती, दरोडा, एचबीडी/ एस./ चोरी./ दंगल, दुखापत, बलात्कार, विनयभंग, अपघात, दारुबंदी, जुगार, इतर, आयपीपी, इतर पीआय इत्यादी गुन्हा संबधात नोंदवलेले व सापडलेल्या गुन्हेगाराविषयी आकलन होते. २०१७ ते २०२० यामध्ये खुन करणाऱ्या गुन्हेगाराचा विचार केला असता, बहुतांश खुन करणाऱ्या आरोपींना पकडण्यात आले असल्याचे दिसून येते परंतु, काही खुन करणाऱ्या गंभीर गुन्ह्यातील गुन्हेगार सापडलेले नसल्याचे निदर्शनास येते. तर डकैती व दरोडा यासारख्या गुन्हातील बहुतांश गुन्हेगार सापडले नाही. चोरी करणारे गुन्हेगार २०१७ मध्ये ४५ टक्के, २०१८ मध्ये ४९ टक्के, २०१९ मध्य ४० टक्के, २०२० मध्ये ३६ टक्के गुन्हेगार सापडले मात्र बहुतांश गुन्हे करणारे सापडलेच नाही असे लक्षात येते. बलात्कार आणि विनयभंग गुन्हाखालील गुन्हेगार २०१७ ते २०२० चा विचार असता १०० टक्के सापडले असल्याचे दिसून आले. स्त्रियांवर होणाऱ्या अत्याचाराचे वर्णन मिनिटाच्या हिशोबाने करावयाचे झाल्यास भारतात स्त्रियावर होणाऱ्या अत्याचारांचे स्वरुप लक्षात घेतले तर दर ५४ मिनिटाला १ बलात्कार, दर २ तासाला १ हुंडाबळी, दर ५३ मिनिटाला १ अपहरण, दर २७ मिनिटाला १ विनयंभग, दर ३३ मिनिटाला १ स्त्रिशी क्रुर वर्तन होते. त्याबरोबर दारुबंदी, जुगार गुन्ह्यातील बहुतांश गुन्हेगार पडले असल्याचे लक्षात येते.

परंतु औरंगाबाद परिक्षेत्रातील गंभीर गुन्हा असलेले खुनाच्या प्रकरणातील अनेक गुन्हेगार मात्र पोलिस यंत्रणाना सापडले नसल्याचे दिसून येते. ही एक गंभीर बाब असुन अशा गुन्हेखालील गुन्हेगारांना पकडणे आवश्यक असते.

ज्या वयात अभ्यासाची गोंडी निर्माण होण्याची आणि आयुष्यातील चांगले जीवन जगण्यासाठी प्रयत्न करणे याविषयी जिद्द असायला हवी मात्र काही तरुणाच्या हातामध्ये बेड्या पडत आहेत. झटपट श्रीमंत बनण्याच्या कल्पनेपोटी खुनासारख्या गंभीर गुन्हा सहजगत्या केला जात आहे. केवळ खुनच नाही तर, चोऱ्या, घर फोडणे, मारामारी करणे, दरोडे घालणे, मारुन टाकण्याचे भाषा करणे, बलात्कार, अपहरण, विनयभंग सारख्या गुन्ह्यांमध्ये तरुण ओढले जात

असल्याचे वास्तव आहे. मात्र त्या सर्व घटनामागे एक सार्वत्रिक कारण सांगितले जाते. ते म्हणजे व्यसनाधिनता, परंतु खुन करणाऱ्या मागे व्यसनाधिनताच असु शकेल, असे नाही. त्यामागे अनेक कारणे असु शकते संपत्ती, प्रेम, समजून घेणे, विरुद्धही भावना, पैसाची आस, कष्ट न करणे, शिक्षण, यासर्व बाबींचा विचार करणे ही महत्त्वाचे आहेत. त्याचबरोबर कुटूंबातील वातावरण, आई-वडील, भाऊ-बहीण, यांच्यावर समाजातील स्थान, आर्थिक स्थिती, सामाजिक प्रतिष्ठा, मागासलेपण हे सुद्धा गुन्हा करण्यास घटक जबाबदार असल्याचे दिसून येते.

**सारांश :**

औरंगाबाद परिक्षेत्रामध्ये इतर राज्यातून रोजगारासाठी येणाऱ्याची संख्या खुप आहे. वाढत्या शहरीकरणाबरोबर लहान-मोठ्या गुन्ह्यांचे प्रमाणही वाढत आहे. खुनासारखे गंभीर गुन्हे कमी होत असले तरी चेन स्नचिंग, घरफोडी, चोऱ्या, अपहरण, अपघात सारख्या गुन्ह्यामध्ये मात्र लक्षणीय वाढ होत आहे. गुन्ह्यांच्या या तुलनेत त्याचा शोध घेण्याचे प्रमाण अत्यल्प असल्याचे दिसून आले.

**संदर्भ :**

१. कुलकर्णी पी. के. २०१३, गुन्हेगारीचे समाजशास्त्र, नागपूर विज्ञा प्रकाशन

२. आत्रे ना. जि. १९११ गुन्हेगार जाती, एम. कनडी इनस्पेक्टर जनरल ऑफ पोलिस

3. http:|\\Aurangabad raalpolice gov.in Statement Showing Reparleso& Detected Crime lignes of Aurangabad Range.

४. आपटे, व सुद्धा, गुन्हेगाराचे कर्दनकाळ, न्यायवैधंक शास्त्र.

५. नाटके निलम, गुन्हा आणि समाजः पुणे डायमंड पब्लिकेशन्स.

**6.** एल थारा भाई २०१७. भारतीय समाजशास्त्राचा अभ्यासः भारतीय समाजशास्त्र समस्या आणि आव्हानेः नई दिल्ली